# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 25/03/2020 (बुधवार)
(दुपार)

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावर मौजा तारसा चौक कन्हान येथे दिनांक 23/03/2020 चे 22.45 वा. ते 23.15 वा. दरम्यान कन्हान पोलीस पथक यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन कन्हान पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 39/ एएच – 2361 क्रमांकाच्या ओम्नी गाडीला थांबविले. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये एकुण 05 (गाई,गोरे) कि. 16,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करीतांना आरोपी नामे– मोहम्मद फिरोज अब्दुल हाफिज अंसारी, वय 38 वर्ष, नया बाजार कामठी मिळून आला. वाहनासह एकुण किंमती 1,31,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक राजेन्द्र, पो.स्टे. कन्हान यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 11(1)(ड)(फ)(ई) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम 184 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पाली 9284354630 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. रामटेक :– दिनांक 24/03/2020 चे 14.00 वा. ते 14.30 वा. दरम्यान 30 वर्षीय फिर्यादी/पीडित यांच्या घरासमोर आरोपी नामे– स्वप्नील महाबिर, रा. पटगोवरी, ता. रामटेक याने पीडितेस अश्लिल शेरेबाजी करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ), 354(ड) भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक मिना बारंगे 9527475217 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर